सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग - ६ करीता )**

क्रमांक :- पोमसं/५/१०/अर्हता-२०१३(पदोन्नती-२०२४)स्थाना पोउनि/९४/२०२४ मुंबई, दिनांक :- २९/०४/२०२५ ~~२८/०४/२०२५~~

**वाचा:-**
१. शासन निर्णय सा.प्र.विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९
२. महसुली विभाग वाटप नियम-२०२१, दि.१४/०७/२०२१
३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१
४. शासन पत्र गृह विभाग क्र. संकीर्ण-०६२०/प्र.क्र.२७६/पोल-५ब, दि.२८/०९/२०२०
५. महाराष्ट्र पोलीस नियमावली, भाग-१, १९५९ मधील नियम ३३ व ५६(३)
६. गृह विभाग क्रमांक पीएमएन - ०६२२ / प्र.क्र.३७० / पोल - ५ ब, दि.२८/०६/२०२२

**-: आदेश :-**

विभागीय अर्हता परीक्षा उत्तीर्ण असलेल्या व पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या सन २०२४-२५ च्या निवडसूचीवरील दि.३०/०४/२०२५ रोजी सेवानिवृत्त होत असलेल्या पात्र अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातील रिक्त पदात पदोन्नती देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

२. पोलीस दलातील पोलीस उप निरीक्षक हे पद गट-ब (अराजपत्रीत) या दर्जाचे आहे, व पदोन्नतीकरिता पात्र झालेले पोलीस अंमलदार हे पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर पदोन्नतीने नियुक्त केले जाणार आहे. त्यामुळे शासन अधिसूचना-महाराष्ट्र शासकीय गट "अ" व गट "ब" (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०२१, दि.१४/०७/२०२१ या प्रकरणी लागु होतात. करिता सदरहु पात्र अंमलदारांकडून महसुली विभागाची पसंती घेण्यात आली आहे.

३. सदरहु नियमावलीतील पदोन्नतीने नियुक्तीकरिता नियम ११ (२) अन्वये महसुल वाटपाचे अधिकार विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहे. सदर अधिकाराचा वापर करुन महसुल विभाग वाटप करण्यात आले आहेत.

४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२-न च्या तरतुदी नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद पोलीस अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातील नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेनुसार नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक या पदावर त्यांचे नावा समोरील रकाना क्र. ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या घटकात पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदाराचे नाव | सध्याची नेमणूक | वाटप झालेला महसुल विभाग | नि:शस्त्र पोउपनि पदी पदोन्नतीवर नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मधुकर दादाराव निळ | छ.संभाजीनगर शहर | छ.संभाजीनगर विभाग | छ.संभाजीनगर शहर |
| २ | दशरथ यशवंत भोकसे | पिंपरी चिंचवड | पुणे विभाग | पिंपरी चिंचवड |

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील नमूद विशेष अनुमती याचीका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

६. सदर पोलीस अंमलदाराविरुद्ध आता गुन्हा दाखल असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असेल / सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल / ते एखादी शिक्षा भोगत असतील / त्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केले असल्यास अश्या प्रकरणी संबंधित घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता, त्यांच्या विरुद्धच्या संबंधित प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलद्वारे / फॅक्सद्वारे तात्काळ पाठवावी व पुढील आदेशाची वाट पहावी.

७. जर संबंधित घटकामध्ये निवडणूकीची प्रक्रिया सुरु असल्यास किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटक प्रमुखांनी त्याबाबत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून, आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजीपूर्वक दक्षता घ्यावी.

८. सदर पदोन्नती आदेशातील पोलीस अंमलदाराला पोलीस उपनिरीक्षक पदावर तात्काळ हजर करुन घ्यावे, व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे, ही विनंती.

९. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

१०. पदोन्नत पोलीस अंमलदारांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

२३/०८/२४

( डॉ.सुखविंदर सिंह )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शहर

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. ४, ६, ९.
कार्यासन क्र.५ मधील प्रमुख लिपीक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
पोलीस उप अधीक्षक संगणक कक्ष :-

२. सदरचे आदेश संकेतस्थळावर "स्थानापन्न पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती-२०२४-२५ (अर्हता-२०१३)- Officiating PSI Promotion Order-२०२४-२५. (Qualifying Exam.२०१३)" या मथळयाखाली ३० दिवसांकरिता प्रसिद्ध करण्यात यावे.

* * *